**नि. फौ. खं. क्र.२२२/२०१६** **सरकार वि. रोहीत**

नि.१३

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – निलकंठ डोळकुंजी राऊत
वय – ६६ वर्ष, धंदा – सेवानिवृत्त
पत्ता – दिघोरी, नागपूर

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील माधवी जुमळे यांचे कडून सुरु</u>**

१. दिनांक ०५.०९.२०१६ रोजी मी पो.स्टे. कन्हान येथे नेमणुकीस होतो. घटनेचा तपास त्यादिवशी माझ्याकडे देण्यात आला. तपासकामी मला फिर्याद व रिपोर्ट प्राप्त झाली. त्यानंतर मी घटनास्थळी दोन पंचांना सोबत घेवून त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१४</u>** देण्यात येत आहे. त्यानंतर मी साक्षिदारांने बयाण नोंदविले. आरोपीला अटक केली. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पंकज यादव यांच्या तर्फे.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळी खूप लोकांची घरे व वस्ती आहे. मी घटनास्थळाच्या चतुःसिमा पंचनामा पाहून सांगू शकतो. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा पोलीस ठाण्यात तयार केला व तेथेच पंचाच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की साक्षिदारांचे बयाण मी स्वतःच्या मर्जीने नोंदविले. हे म्हणणे खरे नाही की आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल करून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष**

SAGAR SHAM JADHAV
Digitally signed by SAGAR SHAM JADHAV
Date: 2024.11.08 17:23:06 +0530

**ठिकाण –कामठी**
**दिनांक –०८/११/२०२४**

**(सागर एस. जाधव)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**